३

अति तात्काळ

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९८८ च्या अंमलबजावणीविषयीच्या सूचना—

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग

परिपत्रक क्र. वेपुर १२८८/५७५/सेवा-१०
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ ऑक्टोबर १९८८

CR1988101201

## परिपत्रक

समानीकरण समितीच्या शिफारशी राज्य शासनाने काही सुधारणासहित स्वीकारल्या असून सुधारित वेतनश्रेणी व त्यामधील प्रारंभिक वेतन निश्चितीबाबतचे नियम वित्त विभागाच्या अधिसूचना क्रमांक वेपुर १२८८/१५४/सेवा-१०, दिनांक १ ऑक्टोबर १९८८ द्वारे निर्गमित करण्यात आले आहेत. कामावर, रजेवर प्रतिनियुक्तीवर अथवा निलंबनाधीन असलेल्या अशा सर्व शासकीय कर्मचाऱ्यांच्या नजरेस हे नियम आणण्यासाठी विभागप्रमुख आणि कार्यालय प्रमुख यांनी तावडतोब उपाययोजना करावी व कर्मचाऱ्यांनी आपले विकल्प लवकरात लवकर सादर करण्यास त्यांना सांगावे जणे करून सुधारित वेतनश्रेणीत त्यांची वेतन निश्चिती करण्याची कार्यवाही विनाविलंब करता येईल. त्यांना असे स्पष्टपणे सांगण्यात यावे की, एकदा दिलेला विकल्प अंतिम असेल आणि वेतनश्रेणी सुधारित करण्यासंबंधातील आदेश निर्गमित करण्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीत जर विकल्प मिळाला नाही तर शासकीय कर्मचाऱ्याने दिनांक १ जानेवारी १९८६ पासून सुधारित वेतनश्रेणीची निवड केली आहे असे समजण्यात येईल. सुधारित वेतनश्रेणी अस्तित्वात आल्यासंबंधीची माहिती त्यांना नव्हती किंवा विकल्प देण्यासाठी पुरेसा कालावधी दिला नव्हता अशी नंतर तक्रार करण्याची पाळी कर्मचाऱ्यांवर येणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

२. विद्यमान श्रेणीत वेतन घेण्याचा विकल्प देणारे कर्मचारी वगळून इतर सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन श्रेणीत आणणे हा महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९८८ च्या नियम ५ चा उद्देश आहे. जे विद्यमान श्रेणी चालू ठेवण्याचा विकल्प देतील ते दिनांक १ जानेवारी १९८६ रोजी देय असलेल्या दराने महागाईभत्ता, तदर्थ महागाई भत्ता आणि अंतरिम वाढी घेत राहतील. जर एखादा शासकीय कर्मचारी स्थायी पद कायमपणे धारण करीत असेल आणि एका वरच्या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत असेल किंवा तो जर प्रतिनियुक्ती इत्यादीवर नसता तर एक किंवा अधिक पदांवर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिला असता, अशा वेळी त्याला एकाच श्रेणीबाबत विद्यमान श्रेणी चालू ठेवण्याचा विकल्प राहील. असा शासकीय कर्मचारी एका स्थायी पदास लागू असलेली किंवा स्थानापन्न पदांपैकी एका पदास लागू असलेली विद्यमान श्रेणी चालू ठेवू शकेल. इतर पदांच्या बाबतीत त्याला सुधारित वेतनश्रेणीतच आणावे लागेल.

शासकीय कर्मचाऱ्यास फक्त स्थायी पदाची किंवा कोणत्याही एका स्थानापन्न पदाची विद्यमान श्रेणी चालू ठेवण्याचा विकल्प उपलब्ध असल्यामुळे जो शासकीय कर्मचारी त्याच्या स्थानापन्न पदाची विद्यमान श्रेणी चालू ठेवील त्याला स्थायी पदाच्या सुधारित वेतनश्रेणीतच आणले जाईल. स्थायी पदाच्या सुधारित श्रेणीत महागाई भत्ता आणि तदर्थ महागाई भत्ता समाविष्ट आहे, या उलट स्थानापन्न पदाच्या श्रेणीत त्याला सध्याच्या दराने महागाई भत्ता, तदर्थ महागाई भत्ता मिळेल. स्थायी पदाच्या सुधारित श्रेणीतील वेतनाच्या आधारे वरच्या स्थानापन्न पदाच्या विद्यमान श्रेणीत वेतन पुनर्निश्चित केल्यास त्याला महागाई भत्ता, तदर्थ महागाई भत्ता आणि अंतरिम वाढीचा लाभ दुसऱ्यांदा मिळेल. हा अहेतुक लाभ टाळण्यासाठीच महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९८८ च्या नियम ५ खालील स्पष्टीकरण ३ ची तरतूद केली आहे.

३. महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९८८ च्या नियम ६ मध्ये विकल्प कशा रीतीने द्यावा आणि तसेच तो कोणत्या प्राधिकाऱ्यास कळवावा हे विहित केले आहे. विकल्प हा नियमांस जोडलेल्या उचित नमुन्यात द्यावयाचा आहे. या बाबतीत हे लक्षात घ्यावयास हवे की, शासकीय कर्मचाऱ्याने विहित मुदतीत विकल्प दिला पाहिजे, एवढेच नव्हे तर तो विकल्प ठरवून दिलेल्या प्राधिकाऱ्याकडे विहित कालावधीत पोहोचेल याची खात्री करून घ्यावयास हवी. दिनांक १ जानेवारी १९८६ आणि हे नियम निर्गमित झाल्याचा दिनांक यामधील कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या व्यक्तीसुद्धा विकल्प द्यावयास पात्र असतील. अशा कर्मचाऱ्यांना विकल्पाचे नमुने पुरविले जातील याची खात्री विभाग प्रमुखांनी व कार्यालय प्रमुखांनी करून घ्यावी आणि विहित कालावधीत विकल्प देण्यास त्यांना सांगावे. हे नियम प्रसिद्ध होण्याच्या वेळेस जे कर्मचारी भारतावाहेर असतील त्यांच्या बाबतीत विकल्प देण्याचा कालावधी भारतामध्ये पदाचा कार्यभार धारण केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांचा राहील. ज्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्या पदांच्या सुधारित श्रेणी महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९८८ निर्गमित केल्याच्या दिनांकानंतर सुधारित झाल्या असतील त्यांच्या बाबतीत तीन महिन्यांचा कालावधी अशा सुधारणेच्या दिनांकापासून राहील.

(G.C.P.) H 1786 (15,000—10-88)

४. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील यासंबंधीच्या विद्यमान तरतुदी या शासन निर्णयामधील तरतुदींपुरत्या सुधारण्यात आल्या आहेत असे मानण्यात यावे. उपरोक्त नियमांत रीतसर सुधारणा यथावकाश करण्यात येईल.

५. या शासन निर्णयाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

व्यं. दे. पानसे,
शासनाचे सह सचिव.

प्रति—

महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
राज्यपालांचे सचिव.
मुख्य मंत्र्यांचे सचिव.
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक.
मंत्रालयीन विभाग.
सर्व विभागीय आयुक्त.
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र. २६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली.
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई.
उप मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती.
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
वित्त विभागातील सर्व कार्यासने.
निवड फाईल, वित्त विभाग—सेवा-१०.

*पत्राद्वारे

१९८८ चा क्रमांक
माहिती व मार्गदर्शनाकरिता प्रत रवाना.